

# मुंबईपासून घ्यायचा धडा

## राहुल मेहरोत्रा

भारत विशेषत: नागरी भारत हा एक संभ्रमित वास्तुशास्त्रीय बहुत्ववादाचे एकमेव भूदृश्य आहे. नागरी भारतीय भूदृश्य तीव्र दुहेरी गुणाने परिचित आहे. जेथे अनकलनीय शहरे निर्माण करण्यात आधुनिकता, पंरपरा, समृद्धता आणि प्रचंड दारिद्र्य, सामूहिकता आणि जातीयता, मध्ययुगीन समाज आणि मोठ्या वेगाने येणारे माहिती तंत्रज्ञान संमिल्लीत आहे. या संमिश्रणाला शहराच्या पारंपरिक समज दूर सारत आहे. आणि ही शहरे प्रामुख्याने स्थितीशील आणि स्थिर अस्तित्व म्हणून पारंपरिक समज यापेक्षा शहर-परिसर 'गती' आणि परिवर्तन याद्वारे अधिक अचूकतेचे प्रतिनिधीत्व करतो.

आज नागरी परिसरात दोन प्रकारची शहरे अस्तित्वात आहेत. स्थितिशील आणि गतिमान. एकाच शहराचे हे दोन संपूर्णपणे विरोधी शब्द स्थायीभाव झाले आहेत. हे स्थितिशील शहर वास्तुशास्त्रीय आणि कायमस्वरुपातील स्मारकशिल्पे याचे प्रतिनिधीत्व करते. तर गतिमान शहराने मधली सुटलेली व्याप्त जागा म्हणजे चालू नगरी - म्हणजेच तात्पुरत्या सामग्रीने बांधलेले कच्चे शहर. गतिमान नगरीत वास्तुशिल्प हे नगराची नजर राहिलेली नाही तर मिरवणुका आणि महोत्सव तिचा नजरेचा भाग झाला आहे. आणि स्मृती चिन्ह ठरले आहे आणि शहराचे हे दर्शन अत्यंत कालिक आहे. अशा या गतिमान आणि विसंवादी बालिश परिस्थितीत नगरीच्या आणि वास्तुशिल्पाच्या संरक्षणाकडे कोण लक्ष देणार? गतिमान आणि स्थिर स्थिती यामध्ये आणि मेळ कसा घालणार? वास्तुशिल्प हे यापुढे या नगरीची नजर ठरणार नसेल मग बांधकामाच्या वारश्याचे संरक्षण म्हणजे तरी काय? द्विधा मन:स्थितीत आम्ही संवर्धन तरी कसे करणार? येथे सांस्कृतिक वारसा या उक्तीला महत्त्वा प्राप्त होते. कारण हा एक आदर्श विचार आहे. ज्यात संस्कृती, स्थानमहात्म्य आणि कदाचित आकांक्षा अत्यंत वेधक मार्गानी परस्पर छेद देतात. संवर्धन दृष्टिकोनासंदर्भात बहुविध प्रश्न निर्माण होतात, जेथे संवर्धनाची कृती किंवा विश्वास हे स्थिरतेच्या पलिकडे अनिवार्यतेने जाऊन गतिमान शहराला घेरा घालतात. संवर्धनविषयक1980 मध्ये झालेल्या चर्चासत्रात 'सांस्कृतिक महत्त्व' या कल्पनेला घेरणारा विचार स्पष्टपणे

उमटले. थोडक्यात (बुरी जाहीरनामा यामुळे) बुरी जाहीरनाम्याने सांस्कृतिक महत्त्वाची व्याख्या गतकालिन, वर्तमानकालीन आणि भविष्यकालिन पिढ्यांसाठी सौंदर्यप्रधान, ऐतिहासिक, वैज्ञानिक किंवा सामाजिक मूल्य होय अशी केली आहे. या व्याख्येत महत्त्व हे स्थायी असते हा विश्वास स्पष्ट केला आहे. ही व्याख्या म्हणजे अवशेषांविषयक प्राचीन विद्या पंडिताने प्रचार केलेल्या चर्चेत जिची पाळेमूळे आहेत असी वस्तु केंद्रित (जीवन विरहित) आहे. तेथे सांस्कृतिक स्मृती ही बहुदा कृतीशून्य प्रक्रिया ठरते अशा उच्चत्तम बहुतत्ववादी समाजात अशा कल्पनेची उपयुक्तता तर काय असणार?

आमची गतिमान नागरिकतेबाबत आमची सांस्कृतिक समज काय असणार? ज्या शहराने आमच्या नागरी वास्तवतेचा मोठा भाग साकारला आहे त्या संदर्भात जर संवर्धनाची कृती ही आमच्या सांस्कृतिक महत्वाद्वारे सांगायची असेल तर मग वास्तुशास्त्रीय त्याचप्रमाणे संवर्धन याविषयक चर्चा या दोन्ही प्रकारच्या रचनेचे महत्त्व याची विषयाची समज यांच आवश्य अंतर्भाव करावा लागेल.

दुदैवाने अनेक संवर्धन विषयक चर्चासत्रात नवीन संभाव्य गोष्टींच्या विरोधात कशाची तरी हानी होणे या स्वरुपातील बदलावर चर्चा होते, कारण लोक विशेषत: संवर्धनाचे प्रयत्न करणारे प्रचारक किंवा आश्रित कोणत्याही नवीन परिस्थितीला भूतकाळातील एखाद्या 'जादूमय घटनें' पेक्षाही अधिक वाईट असल्याबद्दलची प्रतिक्रिया सहज देतात. संवर्धन क्षेत्रातील व्यावसायिक मग, हानीच्या जाणिवेविषयी वर्णन करण्यासाठी तर्कशुद्ध मांडणी करतात. मात्र आमच्या समकालीन नागरी स्थितीसंदर्भात एकाचवेळी नवीन गृहीतशास्त्र कसे ओळखायचे आणि पोस्टकार्डावरील चित्राच्या स्वरुपात राहिलेल्या नगरीत राहण्यापेक्षा त्या गृहितकांवर काम कसे करायचे ही समस्या आहे.

वस्तुत: संवर्धन कार्यकर्ते नेहमीच एक विशिष्ट वृत्ती बाळगतात. त्या वृत्तीसंबंधी इटालो कॅल्व्हिनो आपल्या इनव्हिजीबल सिटीज व्हेअर... या पुस्तकात वर्णन करतो. प्रवाशाला आपल्या नगरीला भेट देण्याकरिता पाचारण केले जाते. त्याचवेळी त्याला काही पोस्टकार्डे नेहमी दाखवातत तशी दाखवली जातात. जर प्रवासी हा त्या नगरीतील रहिवाशाला नाराज करू इच्छित नसेल तर मग पोस्टकार्डावरच्या नगरीच्या चित्रांची तो प्रशंसा करतो आणि आज ते नगर हवे होते अशी बतावणी करत निश्चित मर्यादेत त्यातील बदलावर तो आपला खेद व्यक्त करण्याची काळजी घेतो.

मग बदल संवर्धन चळवळीचा अविभाज्य भाग आहे म्हणून त्याला जवळ कसे करायचे? विशेषत: तत्कालीन वातावरणाचा निर्माता आणि वर्तमानकालीन परिरक्षक हे दोघेही संपूर्णपणे निराळ्या सांस्कृतिक रचनेचे प्रतिनिधीत्व करताना संवर्धन चळवळीचा बदल हा अविभाज्य भाग कसा बनू शकेल? जेथे आपण पुढे आणि मागे याकडे अविर्भावाने बघतो तर मग समकालीन आकांक्षा संवर्धनाची प्रक्रियेला प्रेरणा कशा बरे देतील? समकालीन इंजिन हे नागरी संवर्धनाच्या या प्रक्रियेचा गाडा हाकेल हे एखादा कसे ओळखील? एखादी व्यक्ती सांस्कृतिक महत्त्व आणि कधीकाळी शोधलेले, सांस्कृतिक महत्त्वाची प्रक्रिया चालू ठेवण्यासाठीची उपयुक्तता किंवा गरज हे दोन्हीही कसे अभ्यासू शकेल?

मुंबईतील नागरिक संघांनी ऐतिहासिक फोर्ट भागात काही प्रमाणात केलेल्या कामाने संवर्धनाची प्रक्रिया चालू ठेवण्यासाठी समकालीन इंजिन वापरण्याच्या समस्येला हात घातला आणि अधिक महत्त्वाचे म्हणजे शहरातील आंतर जमाती यांमध्ये चैतन्य आणले आणि नगरीस अस्तित्त्वात असलेल्या निरनिराळ्या जगतांमध्ये उंबरठे उभारले.

ऐतिहासिक इमारती आणि प्रसीमा यांचे संरक्षण करणारा कायदा 1995 मध्ये संमत झाला हे मुंबईचे भाग्यच! तिच्या अस्तित्वाच्या पहिल्या टप्प्यात पोस्टकार्ड शहराच्या वैशिष्ट्यांवर भर देण्यात आला होता. ती लक्षणे म्हणजे रहिवाशांना असणारे घराचे वेड आणि घराबद्दलच्या भावना! संवर्धनाची मानके प्रशिक्षित व्यावसायिकांकडून मिळालेल्या शुद्ध दृष्टिकोनामुळे

स्थिरचिन्हे ठरली. अर्थातच समकालीन शहराच्या मोठ्या प्रमाणात उदयास येणाऱ्या सांस्कृतिक भूदृश्यपासून हे सर्व बौद्धिकदृष्ट्या अलिप्त ठरले. तथापी 'विशेषज्ञांचा संघ' प्रस्थापित करणे हे एक कौशल्यतंत्र होते. त्याची फलनिष्पत्ती मोठ्या प्रमाणात नागरिकांनी उचलून धरलेली संवर्धन प्रक्रिया खर्चिक, नाव दाखल करावयाची प्रक्रिया आणि व्यग्रता बाळगणारी ठरली.

तथापि व्यावसायिकांची आणि स्वयंसेवी संस्थांची भलीमोठी पटलन कार्यरत झाली आणि या कायद्याच्या अंमलबजावणीसह याच कामी गुंतली आणि ते या शहराच्या परिवर्तनीय स्वभावाकडे आणि नागरी संवर्धनाची संबंधित समस्याकडे तसेच ऐतिहासिक स्थळांच्या ठिकाणी होणारा पर्यावरणाचा ऱ्हास याकडे पाहू लागले. जेव्हा सभोवताली सर्वत्र पडझड चालू असताना वैयक्तिक मालकीच्या इमारती राखून ठेवण्यात काय हशील आहे?

पर्यावरणातील प्रत्यक्ष परिस्थितीत झालेली सुधारणा संपादन करण्या व्यतिरिक्त या प्रयत्नामुळे वास्तुशिल्पीय संवर्धन कार्यावरील चर्चा बहुदालघुदृष्टी ठेवणारी. नागरी संवर्धन दृष्टिकोनाकडे वळली. हा लक्षवेधक बदल होता. कारण तो अधिक व्यापक सांस्कृतिक भूदृश्याशी संबंधित होता आणि त्याला विकसित होत जाणारे अस्तित्व होते. या बदलामुळे संवर्धनाची चळवळ नियोजन प्रतिक्रियेच्या जवळ नेता आली आणि हीच नियोजन प्रक्रिया सरतेशेवटी आपल्या शहराच्या आकारमान ठरवण्याचे निर्देश देते. आणखी असे की, संवर्धनाच्या झालेल्या बदलामुळे इतरांना प्रेरणा मिळाली आणि इतरांसाठी शहरातील अशा प्रक्रियाचे एक पूर्व उदाहरण झाले. त्यामुळे त्याची संबद्धता संवर्धन चर्चेच्या पुढे व्यापक नियोजन प्रक्रियेपर्यंत पोहोचली.

मुंबईच्या ऐतिहासिक फोर्ट भागातील काही प्रकरणे पाहणे उपयुक्त ठरेल. संवर्धनाच्या अशा प्रक्रियेत समाविष्ट झालेला फोर्टमधील पहिला उपविभाग म्हणजे श्रेणी एकची खुली मनोरंजनासाठी जागा होय. म्हणजेच ऐतिहासिक ओव्हल मैदान हे होय. हे मैदान 1996 पर्यंत राज्य शासनाच्या कार्यकक्षेत येत होते. ही मोकळी जागा (प्रामुख्याने क्रिकेट खेळण्यासाठी वापरली जाते.) नगरपातळीवरील असल्यामुळे मैदान सुव्यवस्थित ठेवण्यापासून तेथील स्थानिक रहिवासी अलिप्त राहत. परिणामत: या मोकळ्या जागेचा इतका ऱ्हास झाला की, हे अंमली पदार्थाचे व्यवहार, वेश्या व्यवसाय आणि संपूर्ण दुरुपयोगाचे ठिकाण ठरले.

ओव्हल मैदानाच्या परिसरातील विशेषत: प्रामुख्याने महिला रहिवाशांच्या पुढाकाराने बनलेल्या नागरिक संघाने (ओव्हल, कुपरेज रहिवासी संघ) ओव्हल मैदानाची देखभाल महाराष्ट्र शासनाने ठेवावी यासाठी शासनाकडे एक विनंती अर्ज केला. राज्य शासनाने त्याला प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे रहिवासी संघाने न्यायालयाकडे धाव घेतली. उच्च न्यायालयाने रहिवाशांच्या बाजूने निकाल दिला आणि शासनाला त्याने या मैदानाची एकतर देखभाल करावी किंवा हे मैदान रहिवासी संघाच्या सुपूर्द करावे असे निर्देश दिले. अर्थातच 1996 मध्ये ही जागा रहीवाशी संघाच्या ताब्यात घेण्यात आली.

त्यानंतर या परिसरासाठी आराखडे तयार केले आणि या मोकळ्या जागेला कुंपण घालण्यासाठी निधी उभा केला तेथे खुणेची पाटी लावली आणि मैदानात चालण्यासाठी एक मार्गिका तयार केली. ही सर्व कामे राष्ट्रीय वारसा संरक्षण समितीने दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार करण्यात आली. वस्तुत: मैदानात चालण्यासाठी बनवलेली मार्गिका हा निर्णायक घटक ठरला. कारण त्यामुळे या परिसरातील रहिवाशांना या मोकळ्या जागेच्या वापरात गुंतवता आले आणि या जागेच्या देखभालीची काळजी वाहण्यास प्रवृत्त करता आले.

या जागेच्या संरक्षणाकरिता असलेल्या कायद्याचा आणि न्यायदान प्रणाली यांचा वापर करण्याव्यतिरिक्त हा चालण्यासाठी मार्ग मैदानात बांधल्यामुळे याभागातील रहिवासी एकत्र जोडले गेले आणि ही प्रक्रिया या संभाव्य वापरदारांच्या एका नव्याच संघात ही प्रक्रिया नेता आली. त्यांना संरक्षण प्रक्रियेत गुंतवता आले. तसेच त्यामुळे याही मोकळ्या जागेचाच

नवीन सार्थ उपयोग करता आला आणि त्याचवेळी या मैदानाचे ऐतिहासिक (सांस्कृतिक) महत्त्व हळूवारपणे विस्तारले गेले.

सहभागी होण्याच्या संरक्षण दृष्टिकोनातून दुसरे संबंधित क्षेत्र म्हणजे दक्षिण मुंबईतील काळाघोडा परिसर. खरेतर हे नाव काळ्या घोड्यावर स्वार झालेल्या सातवा राजा एडवर्ड याच्या पुतळ्यामुळे पडले. अर्थात हा पुतळा आता तेथे अस्तित्त्वात नाही. तथापी, त्या घोड्याची स्मृती (त्यावर स्वार एडवर्डसह) आजही अस्तित्त्वात आहे. तरुण स्थापस्थशास्त्रीय तज्ज्ञांनी नागरी संकल्पना संशोधन संस्थेच्या मदतीने या संपूर्ण परिसराचे तपशीलवार सर्वेक्षण केले. त्यांनी वाहतूक पद्धतीचा जमीनवापर इत्यादींचा अभ्यास केला. आणि त्यांनी हे प्रसीमा स्थान देशातील सर्वात मोठ्या संकेंद्रित समकालीन कलादालने (आर्टगॅलरी) भरलेले आहे.

यानंतर या भागातील रहिवाशांची संघटना (सार्वजनिक विश्वस्त) बांधण्यात आली. त्याचा उद्देश संरक्षणाकरिता स्वत:चा स्रोत उभारण्याचा होता. या संघटनेने हे संपूर्ण क्षेत्र कला जिल्हा म्हणून घोषित करावे. दरवर्षी कलाउत्सव भरविण्याची नवीन योजना (पहिला उत्सव फेब्रुवारी 1998 मध्ये साजरा झाला) आखली. यामुळे या क्षेत्राचा प्रत्यक्षात विकास करण्यासाठी आणि या वारसा-स्थानाचे संरक्षण करण्याकडे लोकांना आकर्षित करावे अशी विनंती केली. या प्रक्रियेचा निधी उभारण्यासाठी त्याचप्रमाणे या परिसरातील सार्वजनिक स्थाने आणि इमारती याचे संरक्षण आणि पुन:स्थापित करण्याच्या दृष्टीने प्रारंभ झाला या दृष्टीने ही योजना यशस्वी झाली.

हे क्षेत्र कला जिल्हा (आर्ट डिसक्ट्रीक्ट) म्हणून उन्नत केल्याने त्या क्षेत्राचे पुन:स्थापन करण्याचा उपाय ठरला. तथापी काळाघोडा परिसर यापूर्वी कला जिल्हा म्हणून समजला गेला नव्हता. तथापी त्याच्या अंगभूत स्रोतांना संरक्षण प्रक्रियेकडे वळविण्यात आता मार्गस्थ करण्यात आले आहे. कदाचित ही प्रक्रिया भविष्यात खऱ्या अर्थाने कला जिल्हा म्हणून ख्यातनाम होण्यात यशस्वीरित्या लाभकारी ठरेल. त्याचबरोबर कोणत्याही परिस्थितीत हे क्षेत्र एका आणखी बदलत्या स्वरुपात रुपांतरीत होईल. या प्रक्रियेमुळे हे क्षेत्र एका नवीन सार्थकतेकडे झुकते आहे. त्यामुळे संरक्षण प्रक्रियेला फक्त चालनाच मिळाली आहे असे नव्हे तर त्याबरोबरच बहुविध जगातला आपल्या कला आकांक्षांचा अविष्कार करण्यासाठी ही सार्वजनिक जागा पुनर्स्थापित झाली आहे.

बेलार्ड पिअरक्षेत्रामधील आस्थापना एकत्र आणण्याच्या प्रयत्नांना तसेच यश आले आणि त्यातून जी संघटना तयार झाली त्यातून या परिसरातील प्रसीमांचा जो प्रत्यक्ष ऱ्हास झाला आहे त्यावर बोट ठेवण्यात आले. फेरी आणि विक्रेते गेल्या अनेक दशकांत रस्त्यावर ठाण मांडून बसल्यामुळे जे पादचारी पदपथांचा अवलंब करतात त्यांची मोठी गैरसोय होते. फेरीवाले आणि ते पुरवत असलेली सेवा ही आवश्यक आहे हे मान्य करून इमारतीच्या प्रांगणात वापरात नसलेल्या जागेवर या लोकांना सामावून घेण्याची योजना संघाने तयार केली.

समकालीन भारतीय शहराची एक अशी भक्कम प्रतिमा उभी राहिले जेथे दोन भिन्न जगताचे लोक एकाच ठिकाणी सहजीवी एकत्र राहतात आणि जर हे यशस्वीरित्या जमवले तर सहिष्णु बहुत्ववाद तसेच श्रीमंत मानवी मोजमाप यांचे सांकेतिक स्थळ बनले आणि अशा शहराचा पाश्चिमात्य देशात काहीवेळी संपूर्णपणे अभाव असतो.

एक समाज म्हणून आपल्या काही ऐतिहासिक मूर्ती, इमारती आणि वारसा प्रतिमा या टिकवून राहण्याची अधिक संधी आहे. कार्यक्रम आणि आकांक्षा या दोन दृष्टिकोनामध्ये हळूवारपणे समतोल सांभाळावा लागेल. कोणत्याही जागतिक कीर्तीच्या शहरात निरनिराळ्या मतदारसंघामध्ये समझोते घडतात. तसेच गुंतलेले हितसंबंध आणि मतदर्शन यामध्ये निकोप समतोल साधण्यात आशावादी शेवट होतो. तथापी, जगामध्ये चाललेले संरक्षण प्रयत्न, विशेषकरून ते कटु बदल असले तरी, तरी आपले व्यवहार हे भविष्यात सौम्य होतात. कारण बदल हा अटळ असतो.

मुंबईतील या सर्व प्रकरणाने (सर्व फोर्ट भागातील) एका वस्तुस्थितीवर अर्थपूर्ण प्रकाश टाकला आहे आणि ती

वस्तुस्थिती म्हणजे कायदा असताना सुद्धा संरक्षण प्रक्रियेमध्ये समाजाचा सहभाग नसेल तर कुठल्याही प्रमाणात यश संपादन होऊ शकत नाही. तसेच समकालीन हेतू जाणण्याची कल्पना किंवा ही प्रक्रिया सुविधा पुरवल्याने यशस्वी होत नाही तर त्याबरोबर समकालीन वास्तवता आणि या भागातील समस्या याकडे लक्ष दिले पाहिजे. जे क्षेत्र (फोर्ट प्रसीमा) लहान लहान युनिटमध्ये विभागल्यास व्यावसायिकांना आणि बांधिलकी स्वीकारलेल्या नागरिकांना सुधारण्यासाठी खास गट निर्माण करणारे मतदारसंघ संघटीत करण्यात मदत होते. प्रत्येक युनिटचा आकार आटोक्यात ठेवल्याने सर्वसामान्य आकांक्षा साधण्याची संधी वाढली.

या प्रक्रियेने एका मूलभूत समस्येला पुढे आणले. जेव्हा वसाहत उत्तर परिस्थितीत संरक्षण विषय हाताळताना ऐतिहासिक मूर्तींचे संवर्धन करावे अशी सांस्कृतिक मनिषा नसते तर तेथे पर्यावरण चळवळीतून नागरी संरक्षण चळवळ अनिवार्यतेने वाढते. वस्तुत: नागरिकांच्या सर्व पिढ्यांसाठी मुंबई शहरातील व्हिक्टोरीया (आंग्ल देशाच्या विजयखुणा) गाथा हा अविष्कार आणि अनन्यतेचे प्रतिनिधीत्व करतो. या इमारती वसाहतीच्या भूतकाळातील मूर्तीच आहेत. इतरांसाठी ऐतिहासिक केंद्र म्हणजे जेथे नागरी स्वरुपाची संलग्नता आणि स्थापण्याची एकात्मता असते असा भाग आणि नागरी संकल्पना या मुक्या विस्ताराच्या निव्वळ विरोधात एक मनमोहक (किंवा निदान सुंदरतेची संभाव्यता असलेले) पर्यावरण निर्माण करते त्यानेच समकालीन भारतीय नागरी भूदृश्यांना गुणविशेष बदल केले आहेत.

म्हणून या संदर्भात संरक्षण विषयक दृष्टिकोन बाळगल्याचा उद्दिष्टांचा एक स्त्रोत म्हणून इमारती आणि पर्यावरण यांना हाताळले पाहिजे. त्याच्या मूर्तीजन्य किंवा चिन्हांकित निरर्थक बाबींव्यतिरिक्त अशी हाताळणी केली पाहिजे. सध्या या शहरातील एकाच ठिकाणी संबंधित लोक आणि निरनिराळ्या प्रकारे वापर करणारे अनेक मानवसमूह राहतात. या संरक्षणाच्या प्रक्रियेला सोयीचे व्हावे यासाठी इमारतीचा त्याचप्रमाणे नागरी जागा यांचा पुन:उपयोग हा संरक्षणाचे डावपेच म्हणून त्यास प्रोत्साहन देतात. निर्माण होणाऱ्या सामाजिक गरजा आणि समकालीन आकांक्षांना स्वीकारताना, बाह्य आभास शाबूत ठेवण्याच्या शिस्तीचा परस्पर प्रयोगांचा गांभीर्याने विचार केला पाहिजे. समकालीन वास्तवता आणि अनुभव यांच्याशी वास्तुशिल्पाचे बंध घट्ट होण्यास प्रासादाच्या प्रतीकात्मक गळतीला याच प्रक्रियेतून सुरुवात होईल.

जेथे विशिष्ठ नागरी ठसा सर्वसामान्य वास्तुशिल्पीय हस्तक्षेपातून रुपांतरीत होईल आणि समकालीन जीवन आणि वास्तवता यांच्या सेवेस तो केला जाईल. त्याचप्रमाणे नागर भारताच्या अत्यंत संमिश्र अस्तित्त्वाला हाताळण्यासाठी उद्दिष्ट केंद्रित प्रकल्पांना जे मर्यादित करते त्या सांस्कृतिक महत्त्वाचे अस्तित्त्व हे आपल्या उत्तर बहुत्ववादी समाजाला प्रतिसाद देण्यासाठी विस्तारित केले पाहिजे. विशेष करून, गतिशील शहराने नागरी वास्तवतेचा फार मोठा भाग व्यापला आहे. या वस्तुस्थितीशी हे मिळतेजुळते आहे. या गतिशीलतेच्या संदर्भात संरक्षण विषयक चर्चेत अर्थपूर्णतेची रचना ही कल्पना अंतर्भूत करणे आवश्यक ठरेल. वस्तुत: विकसित झालेली सार्थकता ही संरक्षणवाद्यांची भूमिका असल्याचा जो समज आहे तो बदलाचा प्रवक्ता असल्याचे स्पष्ट करेल, हा जो समज आहे. तो परिवर्तनाला विरोध करणारा - असे त्याचे वर्णन करता समकालीन आकांक्षाचा अविष्कार करणारा असा एक अभिकर्ता असा समज.

**अनुवादक : दत्ता कुलकर्णी**

■ ■ ■ ■ ■

